# शारदाबाई गोविंदराव पवार यांचे विचार व कार्य

**गजानन विठ्ठल बोधले,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना :**

हजारो वर्षापासून चालत आलेल्या मनुवादी परंपरेला तडा देण्याचे कार्य मॉ. जिजाऊसाहेब, सावित्रीबाई फुले, माता अहिल्याबाई होळकर, आणि विसाव्या शतकामध्ये पारंपारीक चालिरती रुढी, प्रथा परंपरा यांना न जुमानता सामाजिक शैक्षणिक राजकीय क्षेत्रामध्ये उत्तुंग असे कार्य करणा—या ज्यांची वाढ जडणघडण ही प्रबोधन युगात झाली अशी विसाव्या शतकातील स्त्री म्हणजे शारदाबाई गोविंदराव पवार त्यांचा जीवनप्रवास त्यांचे शैक्षणिक प्रवास, राजकीय, सामाजिक प्रवास हे अभिमानास्पद आहे.

**जीवन परिचय :**

शारदाबाई पवार यांचा जन्म १२ डिसेंबर १९११ रोजी कृष्णराव सखाराम भोसले व लक्ष्मीबाई यांच्या पोटी कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळगडाजवळील गोलिवडे येथे झाला. त्यांचे वडील नोकरी निमित्त कोल्हापूरात स्थायिक झाले. दोन बहिणी व एक भाऊ असे त्यांचे छोटे कुटूंब होते. लहानपणीच पितृ छत्र हरपल्याने त्यांचा सांभाळ मोठया बहिणीने केला. मोठया बहिणीचा विवाह हा काकासाहेब जाधव यांच्याशी झाला होता. काकासाहेब जाधवांना कोल्हापूरचे लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांचा सहवास लाभला होता. साहजिकच काकासाहेबांचा पुरोगामी सत्यशोधक विचारांचे संस्कार शारदाबाई यांच्यावर झाले. काकासाहेब शेतकी खात्यात ऑफिसर होते. ते त्या काळात श्री छत्रपतींच्या वसतिगृहात राहून शिक्षण घेत त्यांनी पुणे येथून बॅचलर इन ॲग्रिकल्चर ची पदवी घेतली होती. नोकरी निमीत्त कुटूंबाची वडाताण होत आहे.हे लक्षात आल्यावर त्यांनी १९१९ साली शारदाबाई व त्यांची मुलगी रमिला यांना काकासाहेबांनी पुण्याच्या सेवासदन मध्ये शिक्षण घेण्यासाठी दाखल केले. सेवासदन ही संस्था न्या. गोविंद रानडे यांनी स्त्री शिक्षणासाठी व स्त्रीयांचे जीवन स्वावलंबी व्हावे यासाठी या सेवासदन संस्थेची स्थापना केली होती. या सेवासदन मध्ये कोणत्याही अनिष्ट प्रथेला थारा दिला जात नसे.न्या. रानडे यांनी सुध्दा प्रस्थापित चालीरिती विरोधात बंड केल्याचे दिसून येते. सेवासदन मधील प्रत्येक विदयार्थीनीवर चांगले संस्कार चांगली विचारसरणी चांगले शिक्षण देण्याचे कार्य जोमाने करत असे. सेवासदनमध्ये शारदाबाई घडल्या संस्थेच्या त्यांच्यावर चांगले संस्कार शिस्त, नियम, कलागुण, यांचा परिपाक त्यांनी अवगत करुन घेतला त्याच बरोबर काकासाहेब व बहिण कमलादेवी यांचा सहवास व काकासाहेब यांचे पुरोगामी सत्यशोधक विचाराची बैठक शारदाबाई यांना अवगत झाली. त्यांना १९२६ मध्ये सेवासदन मधून शिक्षण पूर्ण केले. त्याकाळी मराठा समाजातील स्त्री इतके शिक्षण घेणे हे क्वचितच होते.

**शारदाबाईचे कार्य व विचार दृष्टीकोन :**

काकासाहेबानी शारदाबाई यांचा विवाह गोविंदराव यांच्याशी १९२६ मध्ये सत्यशोधक पध्दतीने करुन दिला. गोविंदराव हे सत्याशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. पारंपारीक व्यवसाय न करता वडिलांच्या विरोधात जाऊन त्यांनी जिद्दीने शिक्षण घेतले. शिक्षणानंतर त्यांनी शिवाजी मराठा संस्थेमध्ये ज्ञानदानाचे कार्य केले. त्यानंतर त्यांनी स्वगावी परतून बारामतीत त्यांनी नोकरी केली. त्यांचा जनसंपर्क मोठा होता. समाजीतील जनतेच्या शेतक—याच्या समस्या ते सोडवित असे. ग्रामीण भागातील खेडयापाडयातील शेतक—याचे मागासलेपण लक्षात आल्यावर त्यांनी श्री शाहू मराठा बोर्डिंग स्थापनेत पुढाकार घेऊन मुलाच्या शिक्षणाची सोय केली. त्यांच्या जोडीला शारदाबाईचा ही हातभार लागला अशा रितीने गोविंदराव शारदाबाई खांदयाला खांदा लावून कार्य करताना दिसून येतात.

शारदाबाईंनी स्वत:चे दागिने विकून थोडी शेत जमिन विकत घेतली होती. शेताला जाण्यासाठी त्यांनी एक टांगा व घोडे विकत घेतले. टांगा चालवायचा कुणी हा प्रश्न जेव्हा निर्माण झाला तेव्हा त्यांनी स्वत: ठरविले की तो आपण स्वत: चालवण्याचा निर्धार त्यांनी केला. त्याकाळी स्त्रियांनी असे कृत्य करणे समाजविरोधात समजले जाई  पण शारदाबाई चांगले संस्कार व

सत्यशोधकी विचारामुळे त्या स्वावलंबी असल्यामुळे त्यांनी प्रगत करत असताना स्वतःच्या सद्सद विवेक बुध्दीला पटेल असे कार्य त्यांनी केले, समाजाची पर्वा केली नाही. कारण त्याकाळी प्रचंड अंधश्रध्दा व अज्ञान या गोष्टीचा प्रार्दुभाव होता. शिक्षणाचे प्रमाण बहुजनांमध्ये अंत्यल्प होते. पारंपारिक रुढी, प्रथा, परंपरेला समाजीतल लोक धरुन होते. कर्मकांड करण्यात लोक धन्यता मानत असत. ते ज्या ठिकाणी रहात होते. त्याठिकाणी भुते रहातात., भुताचे वास्तव्य आहे. असे समाजातील अंधश्रध्दाळू सांगत असत. अमावस पोर्णिमेला भुतांना संतुष्ट करण्यासाठी ते अंधश्रध्दाळू लिंबू, नारळ, कोंबडे व इतर वस्तू त्यांच्या दारापुढे टाकत असत. त्यांचा त्रास त्यांना होत असे पण त्यांनी या गोष्टी कडे कधी ही लक्ष दिले नाही. त्यांनी अशा अंधश्रध्दाळू गोष्टीना कधीही आयुष्यात थारा दिला नाही. त्या विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनवादी दिसून येतात. दिर्घोउदयोगाच्या व कष्टाच्या जोरावर त्यांनी त्यांनी शेती फुलवली पिकवली होती. शेतातील माल धान्य भाजीपाला विक्रीसाठी त्या मुलांना बाजारात पाठवित असत. या माध्यमातून त्यांनी मुलांना शिक्षणाबरोबर त्यांनी मुलांना व्यावहारिक ज्ञान व कौशल्य आत्मसात करण्याचे संस्कार मुलांवर घडवले. मुलांकडून त्याविविध कामे करवून घेत असत. ते काम करत असताना मुलांमध्ये कमीपणाचे संस्कार होऊ नयेत याची पूरेपूर काळजी. बाईंनी घेतली सर्वमुले त्यांना लाडाने बाई म्हणत. शारदाबाई सर्व मुलाना समतेची वागणूक त्यांनी शेजारपाजारी राहणा—या मुलांना त्या देत असत. अशा प्रकारे बाईंनी मुलांमध्ये संस्काराचे शिक्षणाचे, व्यवहाराचे, कौशल्याचे गुण वृध्दिंगत केल्याचे दिसून येते. मुलांना त्यांनी एकप्रकारे स्वावलंबाचे धडे देत असत. व्यवहाराला सामोरे जात असताना येणा—या समस्या व अडी अडचणी मुळे मोठया कुशलतेने सामना करताना दिसून येतात. यांतून त्यांच्यावर आर्थिक स्थैरत निर्माण करण्याचा पाया त्यांनी नकळतपणे घातलेला दिसून येतो. बाईंनी मुलांना चांगले शिक्षण दिले. प्रत्येकाला त्यांनी स्वातंत्र्य दिले. त्यांच्यावर इतर कोणतीही बंधने घातली नाहीत. पण मुल घेत असलेल्या शिक्षणाचा आढावा बाई शाळा कॉलेजात जाऊन घेत असत. त्यांची प्रगती कुठवर चालली आहे. हे पहायच्या मुलांच्या शिक्षणाकरीता बाईंनी अतोनात कष्ट घेतले. याचे फलित म्हणजे त्यांच्यावर झालेले संस्कार होय. स्त्रिया शिकल्या की कुटूंब सुधारते कुटूंब सुधारले की समाज, समाज सुधारला की राष्ट्र सुधारते. राष्ट्राच्या प्रगतीचे मानक हे स्त्री शिक्षणामध्ये आहे. राष्ट्रांचा विकास हा आर्थिक स्थितीवर न पाहता स्त्रियांच्या शिक्षणावर असतो. नुसते शिक्षण देऊन चालणार नाहीत तर त्या माध्यमातून राष्ट्राचा विकास झाला पाहिजे.

बाईंवर सत्यशोधक विचारांचा पगडा होता. तसेच त्या समतावादी विचारांच्या होत्या गोविंदरावांबरोबर त्या सत्यशोधक समाजाच्या कार्यात भाग घेत असत. बहुजन समाजाला आर्थिक व सामाजिक गुलामगिरीतून अंधश्रध्दा रुढी, प्रथा, परंपरा यातून मुक्त करण्याचे साधन किंवा माध्यम म्हणजे शिक्षण आहे. असे बाईंना वाटत असे. म्हणून त्यांनी शिक्षणाबाबत बहुजन समाजात जागृती निर्माण करण्याचे कार्य केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याविषयी त्यांना नितांत आदर व स्नेह होता. म्हणून बाईंनी मुलांना 'रयत' शिक्षण संस्थेत शिकवले. बारामतीत रयतची स्थापना व्हावी अशी त्यांची इच्छा होती. तिही कालांतराने पूर्ण झाली. पवार घराण्याचे तेव्हापासून आतापर्यंत रयत शिक्षण संस्थेचे नाते आजही अतूट आहे. आज एकविसाव्या शतकामध्ये जवखेडा व खैरलांजी यांसारख्या घटना घडत असताना देखील शारदाबाईंनी अस्पृश्यतेचा कायदा अगोदर कितीतरी वर्षे आधी अस्पृशता पाळणे नाकारले होते. त्यांनी आपल्या आयुष्यात धर्म,जात, पंथ, गरिब श्रीमंत उच्च नीच या गोष्टींना अजिबात स्थान दिले नाही. त्यांनी फक्त ज्ञान या गोष्टीला सर्वोच्च स्थान मानलेले दिसते. शारदाबाईंनी जाणीवपूर्वक अस्पृश्यता नाकारली ज्याप्रमाणे म. फुलेंनी अस्पृश्यासाठी पिण्याच्या पाण्याचा हौद उपलब्ध करुन दिला. त्यांना कोणत्याही प्रकारचा भेदभाव जीवन जगत असताना केला नाही. उलट त्यांनी मुलांना सर्वांशी सर्वसमभावाचे संस्कार रुजवलेले दिसतात.

त्याकाळात उंबरठा न ओलांडणारी स्त्री शिक्षण घेऊन मुलांवर चांगले संस्कार घडवून तसेच उच्चशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी होण्याचे धडे देत हा त्यांचा दृष्टीकोनातून फार मोठे साहस होते ती शारदाबाई साठी एक प्रकारची अग्निपरिक्षा होती. सेवासदन मध्ये झालेल्या शिक्षणाचा व

संस्काराचा उपयोग त्यांना आपला संसार चालविताना झाला असे दिसून येते. त्याकाळात राजकारणात स्त्रिया जाणे म्हणजे समाज विरोधात समजले जात होते. मोजक्या स्त्रिया सोडल्या तर बहुजन समाजात असे प्रमाण कमी होते. राजकीय हक्क अधिकार मिळावेत म्हणून रमाबाई रानडे यांनी कार्य केल्याचे दिसून येते. यांची फलश्रूती म्हणजे बाई समाज विकास व प्रगती करण्यासाठी व स्त्रियांचे सक्षमीकरण करण्यासाठी त्यांनी कॉंग्रेस पक्षातर्फे बाईंनी अर्ज भरुन लोकल बोर्डाच्या निवडणुकीत उभ्या राहिल्या. गोविंदरावांचा जनसंपर्क कार्य व बाईंचा समाजातील लोकाप्रती असलेली प्रेम स्नेह आपुलकी व त्यांचे कार्य पाहून त्या लोकल बोर्डावर बिनविरोध निवडून आल्या. १९३८ ते १९५२ पर्यत त्या लोकल बोर्डावर सदस्य होत्या. या काळात त्यांनी अनेक मोठी भूषवली. सामाजिक कार्ये ही केली. जनतेच्या अडीअडचणी सोडविल्या सक्षमपणे त्यांनी महिलांचे नेतृत्व केल्याचे दिसून येते. विना महिलांचे आरक्षण नसतानाही त्यांच्या अंगी फक्त विकास प्रगती, ज्ञान चांगले संस्कार विचार व कार्य हेच गुण आत्मसात करुन घेतले होते. त्यांनी लोकल बोर्डाच्या विविध समित्यावर कार्य केले. अनेक जनहिताची कार्ये केली. यामाध्यमातून शारदाबाईकडे निर्णयक्षमता, कार्यक्षमता व जबाबदारी स्विकारण्याची क्षमता अवगत झाल्याचे दिसून येते. हे कार्य करीत असताना त्यांनी स्वत:च्या फायदयाचा विचार केला नाही. किंवा सार्वजनिक पैशाचा व्यक्तिगत कार्यासाठी उपयोग केलेला नाही. हे सर्व कार्य करीत असताना त्यांना कुटूंबाची समर्थ साथ लाभली.ग्रामीण भागाचा विकास,दवाखाने, शाळा, वीज पाणी उद्योग व्यापार इ. सुविधा मिळाल्या पाहिजेत. शेती विषयी शेतक—यांना मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञांची सोय केली पाहीजे. शेतीविषयक शिबीरे प्रदर्शन भरविली पाहिजेत असे त्यांना मनोमन वाटे. यासाठी त्या राजकारणात उतरल्या एक प्रकारे त्यांनी महिलांचे नेतृत्व न करता कृषिप्रधान देश असणा—या बहुजन बळीराजा जगला पाहिजे त्यांची प्रगती झाली पाहिजे ही त्या मागची भुमिका असल्याचे दिसून येते. शेतक—यांना दुष्काळात त्यांनी मदत केली. बाईंनी स्वातंत्र्य चळवळीत जरी उघड सहभाग घेतला नसला तरी स्वातंत्र्य चळवळीतील कार्य करणा—या कार्यत्यांना बाई मदत व सहकार्य करीत असत. अशा गोष्टीस बाईचा नेहमी पुढाकार व पाठिंबा असे. त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोठे योगदान दिल्याचे दिसते.

एका वेळा त्यांना एका बैलाने मारले तेव्हा त्यांचा पाय मोडला इलाज केला पण पण पाय काही नीट झाला नाही. पुढे अनेक दिवस त्या अंथरुणाचा आधार घेत होत्या. त्यांचे कार्य थांबले. तेव्हा त्यांनी कुबडया घेऊन आपले थांबलेले कार्य केले. त्यांच्या जिद्द व चिकाटी सीमा नव्हती त्या ध्येयवेडया एक समाज कार्य रणरागिणी होत्या. वयामुळे व इतर काही गोष्टीमुळे बाई खचल्या, यात वसंतरावांचा पराभव व १९६२ साली त्यांचा अकाली मृत्यू झाला होता. पुढे १९७२ मध्ये शरद पवार राज्यमंत्री झाल्याचे बाईंनी पाहिले. काही वर्षानंतर बाई तब्येतीमुळे फार खचल्या व १२ ऑगस्ट १९७४ रोजी बाईंनी जगाचा निरोप घेतला.

**सारांश :**

शारदाबाई गोविंदराव पवार हया विसाव्या शतकातील आधुनिक विचारसरणीच्या स्त्री होत्या असे म्हणावे लागेल. कारण आजच्या स्त्रियांना जे जमले नाही ते त्यांनी समाज विरोधात जाऊन कार्य केल्याचे दिसते. वेळप्रसंगी समाज्याच्या चालीरिती रुढी, प्रथा, परंपरेची बंधने जुगारुन त्यांनी समाजकार्य केल्याचे दिसते. हे सर्व कार्य करीत असताना त्यांनी मुलांना समतेची व स्वातंत्र्य आधुनिक विचारसरणीचे बीज रोवलेले दिसते त्यांना उत्तम चांगले उच्च शिक्षण दिले त्यांच बरोबर व्यावहारीक ज्ञान कौशल्य आत्मसात करण्याचे धडे त्यांनी आपल्या मुलांना दिल्याचे दिसते. शारदाबाई हया समताधिष्ठीत व बुध्दीप्रामाण्यवादी विचारसरणीच्या असल्याचे दिसून येतात. त्यांच्या कार्यात विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन आढळून येतो. शारदाबाईचे सामाजिक कार्य हे सकलजनवादी समाजासाठी असल्याचे आढळून येते.

अशा प्रकारे शारदाबाई गोविंदराव पवार यांचे कार्य समस्त स्त्री पुरुषांसाठी प्रेरणा देणारे कार्य आहे.

**संदर्भ :-** १) प्रा. एन. डी. पाटील बीजभाषण, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.